**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेले खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६११/ सातारा | श्री. अजमुद्दीन बक्षुद्दीन मुल्ला ३, सुतार कॉलनी, एम.आय.डी.सी. सातारा-४ | संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, जुने विधान भवन, पुणे-१ | उप आयुक्त (प्रशासन शाखा), जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, जुने विधान भवन, पुणे-१ | जातीच्या प्रमाण पत्राबाबत एकूण पाच मुद्दे. | जातीचे वैधता प्रमाणपत्र तयार करुन पाठविले, त्यामुळे तक्रार राहिलेली नाही, त्यामुळे अपील निकाली काढावे, असे अपीलकर्ते यांनी दिनांक १५.०४.२००९ च्या अर्जानुसार आयोगास कळविले आहे. |
| २ | ६१९/ सातारा | श्री. दिलीप सिताराम देशपांडे मालोजी नगर, सटवाई मंदिरासमोर, कोळकी, ता.फलटण, जि.सातारा | उप अभियंता बांधकाम विभाग, फलटण नगर परिषद, जि.सातारा | मुख्याधिकारी, फलटण नगर परिषद, फलटण, जि.सातारा | रविवार पेठ, फलटण येथील न. भू. क्रमांक ३३५३ मध्ये विना परवाना इमारतीचा वापर असून त्याबाबत संबंधितांवर कारवाई होणेबाबत दिलेल्या अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती. | अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे व अपील निकाली काढण्याबाबत दिनांक १६.०४.२००९ रोजीच्या ' विशेष अपील निर्गत कार्यक्रम' प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ६२७/ सातारा | श्री. सचिन दत्तू थोरात मु.पो.कार्वे (धानाईमळा), ता.कराड, जि.सातारा | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्वे, ता.कराड, जि.सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा | ग्राम पंचायत उत्पन्न वगैरे एकूण ११ मुद्दयांची माहिती. | अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ते यांनी दिनांक १४.०५.२००९ च्या अर्जानुसार आयोगास कळविले आहे. |
| ४ | ६३४/ सातारा | श्री. दिलीप विश्वनाथ घोडके रोखपाल, श्रीकृष्ण नागरी सहकारी पतसंस्था मर्या., लोणंद, ता.खंडाळा, | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती खंडाळा, जि.सातारा | विशेष वसुली अधिकारी, सातारा जिल्हा पत संस्था फेडरेशन यांचेकडील दिनांक १४.११.२००६ रोजीचे जप्ती आदेशाची नोंद | अपीलकर्त्याची मूळ मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अर्जदारास आवश्यक ती माहिती देण्यात आली आहे. दिनांक १६.०४.२००९ रोजीच्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जि.सातारा | | | करुन केलेल्या कार्यवाहीच्या पत्राची प्रमाणित प्रत मिळणेबाबत | 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' प्रपत्रात अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ४ ची अपिले (क्र.६११/ सातारा, ६१९ / सातारा, ६२७/सातारा, व ६३४/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.०६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २९.०५.२००९ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. मनोहर दिनकर चौगुले मु.पो.आळते, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६२१ / कोल्हापूर | निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | सन २००८ मधील माहे मे ते ऑक्टोबर २००८ साठी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडून व रॉकेल डिलरकडून हातकणंगले तालुक्यासाठी मंजूर कोटयाची माहिती तसेच रॉकेल वाटपाची रॉकेल वाटप केंद्रनिहाय दरमहा वेगळी माहिती | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दिनांक २०.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४.६.२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेले खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६२४/ सातारा | श्री. श्रीरंग आनंदा माने भवानी नगर, हिंगणे रोड, वडूज, ता.खटाव, जि.सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत नढवळ, पो.वडूज, ता.खटाव, जि.सातारा | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा | मौजे नढवळ, ता.खटाव जि.सातारा येथील गावठाणमध्ये एकूण किती प्लॉट आहेत, त्याबाबत व, इतर एकूण सात मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने नमुन्यात माहिती देण्याची मागणी केली आहे. तथापी, ग्राम पंचायती मध्ये उपलब्ध असणारी माहिती शुल्क भरुन घेऊन जाण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास कळविले आहे. त्यानुसार अपीलकर्त्याने शुल्क भरुन माहिती आवश्यक तर घ्यावी. |
| २ | ६३०/ सातारा | श्री. संतोष दशरथ साळुंखे मु.पो.देगांव (पा), ता.व जि.सातारा | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत देगांव (पा), ता व जि.सातारा | विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती सातारा, जि.सातारा | दिनांक २९ नोव्हेंबर २००७ च्या मासिक बैठकी मधील विषय क्रमांक ०७ मधील अंदाजपत्रकातील किती कामे पूर्ण झाली याबाबतच्या माहितीसह डेडस्टॉक रजिस्टर व किर्द खतावणी या दोन्ही पुस्तकातील पाच वर्षांची माहिती. | अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती तीन दिवसांत विनाशुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.०४.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' प्रपत्रात नमुद केले होते. त्यानुसार दिनांक १८.०४.२००९ च्या पत्रानुसार सदरहू माहिती अपीलकर्त्यास विनामूल्य देण्यात आल्याचे त्यांनी कळविले आहे व अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे लेखी दिले आहे. |
| ३ | ६४१/ सातारा | श्री. आबासाहेब पांडूरंग रायते मु.पो.कोडोली, ता.कराड, जि.सातारा | जन माहिती अधिकारी, कोडोली ग्राम विकास सेवा सोसायटी, कोडोली, ता.कराड, जि.सातारा | उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा | कर्ज व्याज दर तसेच १० मुद्यांबाबतची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६४२/ सातारा | श्री. प्रशांत यशवंत इंगवले ५०२, गुरुवार पेठ, सातारा | गांव कामगार तलाठी, डबेवाडी, ता.व.जि. सातारा | तहसीलदार सातारा, ता.व जि.सातारा | मौजे डबेवाडी, ता. व जि. सातारा येथील गट नं. ६४/१, यामधील भोगवटदाराचे मालकीचे असलेले क्षेत्र, आणेवारी, तसेच आणेवारी व क्षेत्र यामध्ये असलेल्या तफावती बाबतची माहिती | मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ बाबतची तपशीलवार माहिती गांव कामगार तलाठी, डबेवाडी यांनी विहिती मुदतीत दिली असल्याचे अपिलीय प्राधिकारी यांचे निकाल पत्रानुसार दिसून येते. तसेच मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | ६४३/ सातारा | श्री. संपत वामन पिसाळ मु.पो.शेरे शिंदेवाडी, ता.फलटण, जि.सातारा | सहायक निबंधक सहकारी संस्था, फलटण, ता.फलटण, जि.सातारा | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा. | श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि, फलटण या बँकेचे थकबाकीदार श्री. राजेजीराव विठ्ठलराव नाईकनिंबाळकर, फलटण यांचेविरुध्दच्या दाव्या संबंधातील कागदपत्रे | मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिलेल्या न्याय निर्णयानुसार नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तसेच मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ५ ही अपिले (क्र.६२४/ सातारा, ६३०/सातारा, ६४१/सातारा, ६४२/सातारा व ६४३/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०.०६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
कौंन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६३१/ कोल्हापूर | श्री. शिवाजी आनंदा कापसे घर नं.२६४६, जूनी बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी-वॉड, पाठीमागची बाजू, कोल्हापूर | उप शहर अभियंता, वि.का.क्र १ ते ४ कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर | उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची माहिती व इतर दहा मुद्दे | माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दिनांक २६.०५.२००९ च्या पत्राने कळविले आहे. |
| २ | ६३२/ कोल्हापूर | श्री. समीर बालेखान पठाण ७९९, बी-वॉर्ड, रविवार पेठ, पूल गल्ली तालीम समोर, कोल्हापूर | उप शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर | चीफ ऑडीटर, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | भोगवटदारांनी दाखल केलेल्या अपिलांचा नंबर, कोर्ट व अपिलांसाठी दिलेले म्हणणे यांची छायांकीत प्रत व इतर दोन मुद्दे | सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास प्राप्त करुन दिल्याचे दिनांक २९.०५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | ६४२/ कोल्हापूर | श्री. रामचंद्र जिवबा मोरे मु.पो.गारगोटी, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत गारगोटी, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर | विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत), भूदरगड पंचायत समिती, ता.भूदरगड, जि.कोल्हापूर | दिनांक १.०४.२००७ ते १.१२.२००८ पर्यंत पाणी पुरवठयाची तपशीलवार माहिती | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.०६.२००९ पर्यंत माहिती देण्याचे दिनांक २९.०५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'-तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ६५१/ कोल्हापूर | श्री. सुरेश दिनकरराव गायकवाड १३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर | मुख्य प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, सीएसटी, मुंबई-१ | सह.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत सेंट जॉर्जेस हॉस्पिटल, सीएसटी, मुंबई-१ | अधिष्ठाता यांनी केलेला बेजबाबदापणा व दिनांक २५.११.२००८ रोजी दिलेल्या माहितीबाबत | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार अपील निकाली काढावे असे अपीलकर्त्याने दिनांक २९.०५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'-तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ६५६/ कोल्हापूर | श्री. अभिमन्यु केशव वडेर २४३ ख/१अ, साफल्य अपार्टमेंट, प्लॉट नं.एफ-४, ताराबाई पार्क, कोल्हापूर | उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप- विभाग, दहीवडी, ता.दहीवडी, जि.सातारा | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा, जि.सातारा | शिखर शिंगणापूर येथील विश्रामगृहातील वास्तव्याची माहिती | अपील निकाली काढावे,असे अपीलकर्त्याने दिनांक २९.०५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'-तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | ६१/ २००९/ कोल्हापूर | १.श्री. दिपक शंकरराव चव्हाण कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, १०९२-ई वॉर्ड, शाहूपुरी, कोल्हापूर २. श्री. राजू शेट्टी (मूळ अर्जदार), मु.पो.अर्जुनवाड रोड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,१०९२-ई वॉर्ड, शाहूपुरी, कोल्हापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भूविकास बँक इमारत, ३रा मजला, हॉटेल पर्ल शेजारी, कोल्हापूर | एक लाखापेक्षा जास्त कर्जमाफी झालेल्या लाभार्थींची माहिती, केंद्र शासन व नाबार्डने निर्धारित केलेला कालावधी मध्ये केडीसीसी बँक मार्फत झाले आहे अशा लाभार्थींची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जदारास माहितीबाबतची सी.डी. देण्याचे दिनांक २९.०५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'-तील प्रपत्रात नमूद केले आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्वरित कार्यवाही करावी. |
| ७ | ६३/ २००९/ कोल्हापूर | श्री. शहाजी श्रीपती पाटील मु.पो.तिरपण, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | मुख्याध्यापक, श्री.विलासराव कोरे हायस्कूल, म्हाळुंगे तर्फे बोरगाव, पो.का. ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर | शैक्षणिक वर्ष २००३ ते २००५ या कालावधीत शाळेने शिक्षक कर्मचारी श्री. एस.एस.पाटील यांच्या मान्यतेच्या प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती. | जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ८.०६.२००९ रोजी अपीलकर्त्यास माहिती देण्याचे सर्वानुमते ठरल्याचे दिनांक २९.०५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' तील प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनुक्रमांक. १ ते ७ (क्र. ६३१/कोल्हापूर, ६३२/कोल्हापूर, ६४२/कोल्हापूर, ६५१/कोल्हापूर, ६५६/कोल्हापूर, ६१/२००९/कोल्हापूर, व अपील क्र. ६३/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याचे वरील ज्या अपिलांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे त्यानुसार पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास त्वरित सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३०-०६-२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.नामदेव बाबासाहेब खरात,<br>नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, खंडाळा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>सातारा जिल्हा परिषद, जि. सातारा | हजर |

अपीलकर्ता श्री.नामदेव बाबासाहेब खरात, नितीराज निवास, निरा, ता.पुरंदर जि.पुणे यांनी दि.२३.०१.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा यांचेकडे सन २००६ ची कृषी विभागाची अपंगांची ज्येष्ठता यादी व दि.१३.०१.२००६ च्या श्री.खरात यांच्या पत्राद्वारे संबंधित घटकाकडून झालेल्या कार्यवाहीचा तपशीलाबाबत माहिती मागितली होती. सदर अपिलाच्या अनुषंगाने दाखल कागदपत्रे पहाता या कामी अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१४.०३.२००७ रोजी निर्णय दिला आहे. त्याचे अवलोकन करता अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास पाठविलेल्या दि.१२.१२.२००७ च्या पत्रान्वये व दि.११.०६.२००८ च्या प्रपत्रात नमूद केले आहे. अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २७/०६/२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. संतोष बाळासाहेब शिंदे
रा.एरंडवणा गावठाण, प्लॉट नं.१४,
कर्वे रोड, पुणे-४

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
पोलीस सह आयुक्त, परिमंडळ-१, पुणे शहर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००८ |

**मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. ३०.८.१९९८ रोजी शास्त्रीनगर पोलीस चौकी, दि. २९.१०.१९९८ रोजी कोथरूड व शास्त्रीनगर पोलीस चौकी, दि. ४.६.१९९९ व दि. १७.६.१९९९, ६.३.२०००, रोजी शास्त्रीनगर पोलीस चौकी, दि. २७.११.१९९९, दि. २३.३.२००१ रोजी डेक्कन पोलीस चौकी, दि. ७.१०.२००१ व २२.३.२००२ रोजी प्रभात पोलीस चौकी, दि. १२.१.२००० रोजी फरासखाना पोलीस चौकी येथे व दि. १७.३.२००१ रोजी महिला दक्षता समिती, आयुक्त कार्यालय, पुणे येथून तक्रारींच्या संदर्भात समजपत्रे आली होती, त्यावेळी घेतलेल्या जाब जबाबांच्या साक्षांकित प्रती व इतर अनुषंगिक माहिती

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संतोष बाळासाहेब शिंदे यांनी ऑगस्ट १९९८ ते मार्च २००१ या काळात विविध पोलीस ठाण्यांतमध्ये व महिला दक्षता समित्यांमध्ये केलेल्या तक्रार अर्जांच्या संदभातील जाब जबाबाच्या प्रती आदी माहिती जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पुणे शहर यांच्याकडे मागितली होती. पोलीस नियमावली भाग २, परिच्छेद १५, नियम क्र.२६२ नुसार ठरलेल्या अभिलेखाच्या वर्गवारीनुसार

संबंधित कागदपत्रे नाश करण्यात आल्याचे व त्यामुळे माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता श्री. शिंदे यांना कळविले. त्या विरूध्द केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी होऊन निकाल प्राप्त झाला नाही व माहिती प्राप्त झाली नाही, म्हणून श्री. शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि. २४.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता, त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

संबंधित अभिलेख नाश करण्यात आले असून श्री. शिंदे यांना तसे विहित मुदतीत कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, डेक्कन विभाग, पुणे श्री. अशोक भोई यांनी प्रपत्रात नमूद केले. त्याचा पुनरूच्चार त्यांनी आयोगापुढील सुनावणीत पूरक कागदपत्रांसह केला. संबंधित नियमावलीतील वर्गवारीनुसार या कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी दोन वर्षांचा असल्याचे त्यांनी नमूद केले. ही बाब लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा. संपत माधव त्रिभुवन
रा. भिमार्थ, इंगळे नगर, सिध्दार्थ कॉलनी,
वारजे नाका, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
चिटणीस, शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ, घोडनदी,
ता. शिरूर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
डॉ.बसू विद्याधाम, लोणीकंद, ता.हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२००८ |

**<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

शाळेच्या आर्थिक बाबी व ताळेबंद पत्रक, शाळा समित्यांच्या सभेचे इतिवृत्त, व शाळेतील विविध कागदपत्रांच्या प्रती व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

अपीलकर्ता प्रा. संपत माधव त्रिभुवन यांनी डॉ.बसू विद्याधाम, लोणीकंदच्या संदर्भातील सन २००३-०४, २००६-०७ या कालावधीतील आर्थिक व्यवहाराची व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचीही माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यांच्याकडे मागितली होती. काही माहिती जाणून बुजून अपूर्ण व चुकीची दिली, पर्यायाने नाकारली, या कारणावरून श्री. त्रिभुवन यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त माहितीबाबत उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने अपील सुनावणीसाठी ठेवण्यात आले.

बरीचशी माहिती आपणापासून दडवून ठेवण्यात आली आहे, 'ताळेबंद पत्रक शाळेत नाही' असे उत्तर दिले आहे, शाळेतील लेजरमधील संस्थेच्या खात्याचा उतारा व पूर्ण माहिती दिलेली नाही, बँकेच्या चार खात्यांची माहिती दिली असली तरी त्या व्यतिरिक्त मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या नावे खाती आहेत, त्याला शाळेची शिफारस आहे, शालेय निधी, शालेय परीक्षेसाठीचे शुल्क; देणग्या; पावत्या; शालेय पोषण आहार अनुदान विनियोग आदी माहिती पूर्ण मिळालेली नाही, असे प्रतिपादन प्रा. त्रिभुवन यांचे प्रतिनिधी श्री. गोरखनाथ ज्ञानदेव वेताळ यांनी केले. प्रा. त्रिभुवन यांनी विशिष्ट तक्त्यामध्ये माहिती मागितली होती, त्यानुसार माहिती दिली नाही, असेही त्यांनी नमूद केले.

ताळेबंद पत्रकासह सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. प्रा. त्रिभुवन यांच्या वतीने श्री. का.ना.वेताळ यांनी माहिती समक्ष स्वीकारल्याचे पत्र त्यांनी सादर केले. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या नावावर जे खाते आहे त्यात परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क यांचे पैसे ठेवले जातात. ते त्या त्या वर्षापुरते असते, ते परीक्षेच्या वेळी खर्च केले जातात. पालकांकडून अथवा कोणाकडूनही देणग्या घेतल्या जात नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. बसू विद्याधाम, लोणीकंद श्री. सुभाष जयवंत वेताळ यांनी सांगितले. आपल्याला लेजरच्या प्रती दिल्या. त्यावेळी काही ठिकाणी कागद चिकटविलेले होते, अशी तक्रार श्री. वेताळ यांनी केली. परंतु जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. गोरखनाथ ज्ञानदेव वेताळ यांनी आयोगापुढे लेजर सादर केले त्यात कागद चिकटविल्याचे आढळले नाही. तसेच दिलेल्या प्रती लेजर बरहुकूम असल्याचे दिसून आले. दिलेल्या माहितीच्या प्रतीही त्यांनी सादर केल्या. विस्तृत माहितीची मागणी असून प्रत्येक वेळी ती अपीलकर्त्याने दिलेल्या नमुन्यांच्या तक्त्यामध्येच देणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. ते रास्त आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता माहिती देण्यात आली आहे. तसेच माहिती नाकारण्याचा उद्देश असल्याचे दिसून येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेल अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हरकचंद माणिकलाल खाबिया
१४९,/१, मारुती आळी, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
ढोले पाटील रोड, पुणे नं.१ — उत्तरवादी

१.**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, गोरक्षण पांजरपोळ संस्था,
घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे-४१२२१०
२.**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, श्री.वासुपूज्य स्वामी जैन
श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, ता.शिरुर, जि.पुणे
३.**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस श्री शिवसेवा मंडळ,
विश्वस्त शिवसेवा मंडळ, ता.शिरुर जि.पुणे
४.**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ,
घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे-४१२२१०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७३+८७४+८७५+८७६+८७७+९५१+१०२०/पुणे/२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हरकचंद माणिकलाल खाबिया
१४९,/१, मारुती आळी, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

१.**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष. गोरक्षण पांजरपोळ संस्था.
घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे-४१२२१० श्री.रमणलाल हिरामण बोरा

२.**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, श्री वासुपूज्य स्वामी
जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, ता.शिरुर, जि.पुणे श्री.वि.बा.दुगड

३.**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस श्री शिवसेवा मंडळ,
विश्वस्त, शिवसेवा मंडळ, ता.शिरुर जि.पुणे प्रतिनिधी श्री.मनसुख शांतीलाल गुगळे

४. **जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ,
घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे-४१२२१० श्री.टी.एम.परदेशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१.२००७, १८.१.२००७, २७.११.२००६, २०.२.२००७, २३.३.२००७,६.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१.२००७, ३१.१.२००७, ८.१११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

गोरक्षण पांजरपोळ संस्था, घोडनदी, ता.शिरुर, श्री वासुपूज्य स्वामी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, ता.शिरुर, जि.पुणे, श्री शिवसेवा मंडळ, ता.शिरुर जि.पुणे या संस्थांच्या जागेबद्दल, कोर्टाचे दावे, अतिक्रमण, ट्रस्ट प्रॉपर्टी, ऑडिट, जनावरे, विटभट्टी, घरजागेबद्दल इ.माहिती.

**शासनाकडून शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थांचे भाडे येते ते किती** वर्ग-खोल्यांचे, त्याला सरकारी इंजिनिअरकडून मिळालेला नकाशा व त्यांच्याकडून मंजुरीसाठी पाठविलेला अहवाल, ढोबळे कन्स्ट्रक्शन यांना काम दिले त्याचे टेंडर जाहीर केलेले नव्हते. त्यामध्ये कोणाकोणाचे टेंडर आले होते? श्री.सुनिल देशपांडे यांच्या खात्यामधून संस्थेकडे किती रक्कम जमा झाली, त्याचा आकडा व खर्च केली गेली त्याचा आकडा, त्यावर संस्थेने किती इन्कमटॅक्स भरला, ज्या लोकांनी रक्कम जमा केली त्यांना पावत्या देण्यात आल्या त्याची यादी.

**श्री.सुनिल देशपांडे यांची ॲन्टी करप्शन ब्यूरो, पुणे यांनी चौकशी केली. त्याबाबत** संस्थेने घेतलेली भूमिका, त्याबद्दलचा ठराव, तसेच त्यांचे खात्यातील पैसे संस्थेच्या खात्यात

| | |
|---|---|
| | ज्या क्रमांकासाठी केलेला दुगड, दि.२५ / २००६ रोजी संस्थेचे चिटणीस यांनी दुगड व बरमेचा या विद्यार्थ्यांना कमी करण्याची नोटीस देऊन दाखला घेऊन जा असे कळविले, यातील दुगड यांना परत घेतले व बरमेचा यांना दाखला देण्यात आला याबाबतचा संस्थेचा ठराव. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.हरकचंद माणिकलाल खाबिया यांनी शिरुर, जिल्हा पुणे येथील विविध संस्थांकडे माहिती मागणारे अर्ज केले असून माहिती न मिळाल्याच्या व अपिलीय प्राधिकाऱ्यांकडूनही आपल्या अर्जावर योग्य ती कार्यवाही न झाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

दि.२७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

या सर्व अपिलांमध्ये आपल्याला माहिती मिळालेली नाही. ती मिळावी व माहिती न दिल्याबद्दल संबंधितांविरुध्द कारवाई करावी, अशी मागणी श्री.खाबिया यांनी लेखी व तोंडी केली.

**अपील क्रमांक / ८७३**

श्री.खाबिया यांनी दि.१८.१.२००७ रोजी माहिती मागविली. माहिती समक्ष नेणार असल्याचे अर्जात त्यांनी म्हटले असल्यामुळे ती घेऊन जाण्याबद्दल त्यांना दि.२५.१.२००७ रोजी कळविले. परंतु ते संस्थेकडे कधीही माहिती नेण्यासाठी आले नाहीत. त्यामुळे माहिती देता आली नाही. त्यानंतर माहिती टपालाने पाठविली, असे गोरक्षण पांजरपोळ संस्था, घोडनदी, ता.शिरुर संस्थेचे अध्यक्ष श्री.रमणलाल हिरालाल बोरा यांनी सांगितले.

संस्थेची उपलब्ध असलेली सर्व माहिती श्री.खाबिया यांना दिली. तसेच आगीमध्ये जळालेल्या कागदपत्रांमधील माहिती देता आली नाही. संस्थेच्या दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या अहवालामध्ये अपीलकर्त्याला हवी असलेली सर्व माहिती असते. अहवालाची प्रत सर्वांना उपलब्ध असून श्री.खाबिया यांनाही देण्यात येईल, असे श्री वासुपूज्य स्वामी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, ता.शिरुर, जि.पुणे संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष श्री.वि.बा.दुगड यांनी नमूद केले. श्री.खाबिया यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना मागणीप्रमाणे माहिती वारंवार देण्यात आली असून त्यांनी संस्थेविरुध्द लावलेला दावा उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. फक्त त्रास देण्याच्या हेतूने ते पुन्हा पुन: माहिती मागत असतात, असे श्री.दुगड यांनी लेखी व तोंडी प्रतिपादन केले.

## अपील क्रमांक / ८७५

माहिती देण्याबाबते पत्र पाठविल्याचे श्री शिवसेवा मंडळ, ता.शिरुर जि.पुणे संस्थेचे जन माहिती अधिकारी म्हणत असले तरी आपल्याला असे पत्र मिळाले नाही, असे प्रतिपादन श्री.खाबिया यांनी केले. मात्र टपालाचा दाखला घेऊन असे पत्र पाठविल्याचे श्री शिवसेवा मंडळाचे विश्वस्त श्री.शांतीलाल गुगळे यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले. मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व वीस वर्षांपूर्वीची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## अपील क्रमांक / ८७६

आपल्याला माहिती मिळाली असून अपील निकाली काढण्याबाबत श्री.खाबिया यांनी लेखी नमूद केल्याचे गोरक्षण पांजरपोळ संस्थेचे अध्यक्ष श्री.रमणलाल बोरा यांनी निदर्शनास आणले.

वरील सर्व संस्था विश्वस्त संस्था आहेत. माहिती देण्याची तयारी त्यांनी दर्शविली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. श्री.खाबिया यांनी आपल्याला

पत्रे मिळाली नसल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात संबंधित संस्थांची माहिती न देण्याची भूमिका दिसत नाही. देय माहिती श्री.खाबिया यांना योग्य ते शुल्क आकारुन द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. मात्र आपल्याला या संस्थांकडून माहिती मिळाली नाही, असे लेखी निवेदन श्री.खाबिया यांनी दि.१४.७.२००८ रोजी आयोगाला पाठविले. परंतु श्री.खाबिया समक्ष माहिती नेण्याचे नमूद करून प्रत्यक्ष माहिती नेण्यास येत नाहीत. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळीही बव्हंश वेळा ते हजर नव्हते. आयोगापुढील सुनावणीनंतरही ते माहिती नेण्यास आले नाहीत, असे वरील संस्थांनी आयोगाला कळविले आहे. श्री.खाबिया यांनी शिरुर शहरातील २७ संस्थांकडे अशा प्रकारे विस्तृत माहितीची मागणी करणारे अर्ज केले आहेत. धर्मादाय आयुक्तांकडील तक्रारीपासून उच्च न्यायालयातील दाव्यापर्यंत विविध प्रकारे त्रास देऊन दबाव आणण्याचा प्रयत्न ते सातत्याने करीत असतात, या लेखी व तोंडी प्रतिपादनाचा पुनरुच्चार त्यांनी केला आहे.

अपील क्रमांक / ९५१+१०२०

श्री.खाबिया यांच्या या अपिलांचा दि.२७.६.२००८ रोजी अयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त समावेश होता. अपील क्र.१०२० चा मूळ अर्ज उपलब्ध झालेला नसल्यामुळे व अपील क्र.९५१ व १०२० या दोन्हीमधील मजकूर सारखाच असल्यामुळे माहिती देण्याबाबत नेमकी स्थिती स्पष्ट नव्हती. मात्र श्री.खाबिया यांनी समक्ष माहिती घेऊन जाणार असल्याचे नमूद केले होते. माहिती नेण्यास कळविण्यातही आले होते. ते आले नाहीत, त्यामुळे टपालाने माहिती पाठविण्यात आली, असे चिटणीस, शिरुर शिक्षण प्रसारक मंडळ श्री.टी.एम.परदेशी यांनी प्रपत्रात नमूद केले. श्री.खाबिया यांनी अपील क्र.१०२० मधील अर्जाची छायांकित प्रत 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या दिवशी दिली व त्यानुसार माहिती मिळावी, अशी मागणी नमूद केली. आपल्या संस्थेकडील काही माहिती श्री.खाबिया यांनी यापूर्वी स्वत: नेली आहे. अन्य माहिती

पाहिजे असल्यास श्री.खाबिया यांना ती देण्यात येईल, असे श्री.परदेशी यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

वरील सर्व अपिलांमध्ये श्री.खाबिया यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची, आरोप-प्रत्यारोप करणारी विधाने असलेली, प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीची अशी संमिश्र आहे. आपल्या हेतूबाबतचे आरोप त्यांनी नाकारले असले व सार्वजनिक संस्थांमधील गैरकारभार उजेडात आणण्यासाठी आपण अर्ज करीत असल्याचे त्यांचे प्रतिपादन असले तरी, उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे, तोंडी निवेदने यांचा विचार करता श्री.खाबिया यांच्या भूमिकेबाबत संदिग्धता निर्माण होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेली पारदर्शकता केवळ सार्वजनिक प्राधिकरणांपुरती वा सार्वजनिक संस्थांपुरतीच मर्यादित नाही. माहिती मागणारांनाही पारदर्शकतेचे तत्त्व लागू असले पाहिजे, याची जाणीव श्री.खाबिया यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब रामभाऊ काकडे व इतर ८९
गंगानगर, नगर-पुणे बायपास हायवे, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१४ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळासाहेब रामभाऊ काकडे
गंगानगर, नगर-पुणे बायपास हायवे, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्यं प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्रीमती अमिता तळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरुर नगरपरिषद, ता.शिरुर, जि.पुणे श्री.शिवाजीराव कापरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१०.२००६,१७.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.११.२००६, ८.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>शिरुर नगरपरिषद वाढीव पाणीपुरवठा योजनेंतर्गत गंगानगर भागातील जलवाहिन्यांचे काम केव्हा होणार, वाढीव पाणीपुरवठा गंगानगर व इतर उपनगरे मंजूर निविदा प्रत, योजनेंतर्गत मुख्य जलवाहिन्या व वितरण संस्था दर्शविणारा नकाशा, योजनेची एकूण किंमत व आतापर्यंत झालेला खर्च, योजनेची सद्यस्थिती योजना अपूर्ण राहण्याची कारण व योजना पूर्ण करुन कार्यान्वित करण्याचा दिनांक, योजनेमध्ये गंगानगर भागाचा समावेश आहे अगर कसे. | |

## विवेचन

गंगानगर, ता.शिरुर येथील वाढीव पाणीपुरवठ्याच्या योजने संदर्भातील जलवाहिन्यांचे काम व त्याबाबतच्या नकाशासह विविध मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.बाळासाहेब रामभाऊ काकडे व इतर ८९ यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरुर नगरपरिषद यांच्याकडे मागितली होती. संबंधित माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विकास विभाग क्र.१ यांच्याशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून घ्यावी, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रारंभी कळविले. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्या आदेशानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन माहिती देण्यात आली. परंतु गंगानगर वसाहतीमधील रहिवाशांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व नळजोडणी व्हावी, ही मागणी पूर्ण होत नसल्याच्या कारणावरुन श्री.काकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२४.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. तीनही घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

गंगानगर वसाहतीला पाणीपुरवठा व्हावा, हीच श्री.काकडे व इतर अर्जदार यांची मुख्य मागणी असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरुर नगरपरिषद श्री.शिवाजीराव कापरे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.काकडे यांनी या मागणीबाबत प्रतिपादन केले. तसेच योजनेचे वेगवेगळे आराखडे दिले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. या अनुषंगाने संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मुख्याधिकारी, नगरपरिषद यांच्यातर्फे वेळोवेळी देण्यात आल्याचे श्री.कापरे यांनी सांगितले. नगरपरिषदेने दिलेला व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिलेला हे दोन्ही आराखडे स्वतंत्र असून दिलेली माहिती योग्य आहे, असे श्री.कापरे यांनी स्पष्ट केले. श्री.काकडे यांनी ते समजून घेतले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता मुख्य मागणी पाणीपुरवठा करण्याची आहे. हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कार्यवाहीच्या मागणीचा विचार करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.६.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अमिन जैनुद्दीन शेख
रा. २१/१२/३६/२, दुर्गा दर्शन, यमुना नगर,
निगडी, पुणे-४४ — अपीलकर्ता

विरुध्द

**१.अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर
जि.सोलापूर — उत्तरवादी

**२.अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली,
हवेली पंचायत समिती कार्यालय, पुणे

**१.जन माहिती अधिकारी** तथा
गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर
जि. सोलापूर

**२. जन माहिती अधिकारी** तथा
गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२१+१६८९+१६९० /२००८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२००८ |

मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

१. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.डीएसआर-२००३/प्र.क्र.१२७/आस्था-५, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ११ ते २००४ नुसार मुख्यलेखा व वित्त अधिकारी यांचेकडून कार्यालयास किती सेवानिवृत्त शिक्षकांचे सुधारित सेवानिवृत्ती वेतन आदेश मिळाले.
२. सर्व आदेशात वाढीव अंश रक्कम, एकूण रकमेतून वसूल करून समायोजित करण्यात यावी, अशी टिप देण्यात आली आहे का ? ३. सर्व सुधारित पेन्शन धारकांच्या देय रकमेतून वसुली घेण्यात आली का ?

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अमिन जैनुद्दीन शेख यांनी वेतनातील फरकाची येणे रक्कम मिळण्यासाठी केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबतचा आक्षेप नोंदवून जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर व गट शिक्षण अधिकारी, हवेली पंचायत समिती, जि. पुणे यांच्याकडे अर्ज केले होते. कार्यवाहीविषयक आक्षेपांबाबतचा खुलासा व अपेक्षेप्रमाणे कार्यवाही करण्याची मागणी श्री. शेख यांनी अर्जात केली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे श्री. शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, उत्तर सोलापूर व गट विकास अधिकारी, हवेली पंचायत समिती, जि. पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

श्री. शेख (वय ६६ वर्षे ) हे मुख्याध्यापक तथा तालुका मास्तर होते. सेवा विषयक आर्थिक लाभ व अन्य सवलती आपल्याला योग्य प्रकारे मिळाल्या नाहीत, वेतन वाढीचा फरक मिळावा, फरकाच्या रकमेचे १२ टक्के दराने व्याज मिळावे, नुकसानभरपाई मिळावी इ. मागण्या सन २००४ पासून ते करीत आले आहेत. जिल्हा परिषद, सोलापूर, गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक); जिल्हा परिषद; सोलापूर आदी विविध स्तरांवर या बाबत ते सातत्याने पत्रव्यवहार करीत आले आहेत. त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने वेळोवेळी विविध अधिकाऱ्यांनी त्यांना उत्तरे दिली आहेत, तसेच फरक बिल मिळण्याच्या संदर्भात कार्यवाहीही केली आहे. परंतु ही कार्यवाही समाधानकारक नाही, असे श्री. शेख यांचे म्हणणे आहे व ती कशा प्रकारे केली जावी हे त्यांनी विविध निवेदनांद्वारे सुचविले आहे.

"गट शिक्षण अधिकाऱ्यांनी फरक बिला संदर्भात कनिष्ठ लेखाधिकाऱ्यांशी संगनमत करून 'एक पगारवाढ कायमची बंदच नाही, तर त्याचा फरक बिल देण्याचा प्रश्नच नाही,' अशी भूमिका घेऊन त्यासाठी खोटा वेतन अभिलेख तयार केला व त्यावर अर्थ खात्याची मंजुरी मिळविली, सेवा पुस्तकात तशी खोटी नोंद घेतली. खोटा अभिलेख त्यावरील मंजुरीचे पत्र मला देऊन ब्लॅकमेल करु लागले. हा सर्व व्यवहार घडल्यानंतर आपण माहिती मागणीचा अर्ज दिला आहे," असे श्री. शेख यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

त्यांची सर्व देणी देण्यात आली असून आवश्यक ती माहितीही वेळोवेळी दिली आहे, असे विविध अधिकाऱ्यांनी लेखी व तोंडी नमूद केले आहे.

आयोगाने दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. वेतन निश्चितीत दुरूस्ती करावी व त्यानुसार फरकाचे बिल मिळावे, वाढीव अंशाची घेतलेली वसुली परत देण्यात यावी, तसेच आपल्या समवेत असलेल्या इतर शिक्षकांची सेवापुस्तके समक्ष दाखवावी, आपल्या मागणीसंदर्भात स्पष्ट निर्णय मिळावा, अशी मागणी श्री. शेख यांनी (अपील क्र. ९२९/पुणे व १६८९/पुणे ) प्रपत्रात नोंदविली आहे. सेवापुस्तके पाहणीसारख्या यांतील काही मागण्या मूळ अर्जात् वा अपिलातही नव्हत्या.

'माहिती वेळेत देण्यात आली आहे, वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडील पत्रानुसार कार्यवाही करण्यात येईल,' असे तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. श्री. शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती मागावी, ती त्यांना देण्यात येईल. आर्थिक मागणीची प्रशासकीय कार्यवाहीविषयक पूर्तता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कायद्याखाली करता येणार नाही, असे गट शिक्षण अधिकारी. पंचायत समिती, उत्तर सोलापूर यांनी प्रपत्रात व लेखी निवेदनाद्वारे नमूद केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय बाजूंचे एकमत न झाल्याने सदर दिवशीच सुनावणी घेण्यात आली.

आपले फरकाचे बिल सदोष असून वेळोवेळी त्याचे पुरावे आपण संबंधित अधिकाऱ्यांना सादर केले आहेत, तरी पूर्तता केली जात नाही, असे निवेदन श्री. शेख यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. फरक बिलाच्या अनुषंगाने आवश्यक त्या दुरूस्त्या केल्या आहेत. श्री. शेख यांना झालेल्या शिक्षेमध्ये एक वेतनवाढ रोखण्यात आली होती, ती त्यांना पुन्हा देण्यात आली असून त्यांची सर्व देणी देण्यात आली आहेत. अंश राशीकरणाची शासकीय वसुलीबाबतची त्यांची मुख्य मागणी आहे. ही वसुली त्यांना देण्यात येईल. तसेच त्यांची आणखी काही मागणी असल्यास त्यांनी ती मांडावी, त्याची दखल घेतली जाईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी श्री. डी.बी.सावंत यांनी केले.

सुनावणीत दिलेल्या आश्वासनानुसार गट शिक्षण अधिकाऱ्यांनी सेवानिवृत्ती वेतनातून रू.१२०/- वसुल केले असून त्याचा खुलासा दिलेला नाही, असे श्री. शेख यांनी दि. १७.१०.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. आयोगाने त्याबाबत विचारणा केल्यानंतर गट शिक्षणअधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर

श्री. एस. एस. शिवशरण यांनी दि. ३०.६.२००९ रोजी आयोगाला अहवाल सादर केला असून श्री. शेख यांच्या आर्थिक मागणीची पूर्तता त्या त्या वेळी केलेली आहे. आणखी माहिती हवी असल्यास त्यांनी संपर्क साधल्यास माहिती देण्याचे दि. २७.८.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ठरले होते, परंतु त्यांनी संपर्क साधलेला नाही. त्यांना कोणतीही माहिती देण्यास गट शिक्षण अधिकारी कार्यालय तयार आहे, असे नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री. शेख यांची मागणी प्रामुख्याने आर्थिक कार्यवाहीशी संबंधित आहे. त्यांनी मागितलेली 'माहिती' ही त्यांच्या आक्षेपाच्या अनुषंगाने खुलासा मागणारी आहे. अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

सबब आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मधुकर भिमाजी चाबुकस्वार
मु.काठपूर बु., पो.लाखनगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४८ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधुकर भिमाजी चाबुकस्वार
मु.काठपूर बु., पो.लाखनगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी प्रतिनिधी श्री.प्रमोद जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१, पुणे श्री.प्रमोद जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मागासवर्गीय ग्रामपंचायत सदस्य यांनी जातपडताळणी करुन किती दिवसात घ्यावी, मुलाखतीला बोलवले असताना अर्जदार हजर होत नसतील तर समिती कागदपत्रांच्या आधारे निर्णय का होत याविषयी खुलासा. | |

## विवेचन

आंबेगाव तालुक्यातील निवडून आलेले ग्रामपंचायत सदस्य व त्यांची जात प्रमाणपत्र पडताळणी याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.मधुकर भिमाजी चाबुकस्वार यांनी जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१, पुणे यांच्याकडे मागितली होती. माहिती विहित मुदतीत न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.चाबुकस्वार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, क्र.१, पुणे याच्याकडे अपील केले. त्यात काही बाबींचा खुलासा मागितला. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून श्री.चाबुकस्वार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

गावातील सरपंच व अन्य सदस्यांच्या जात पडताळणीबाबत श्री.चाबुकस्वार यांनी माहिती मागितली होती. परंतु या अनुषंगाने समितीपुढे सुनावणी चालू आहे. प्रशासकीय / अर्धन्यायिक कार्यवाहीची मागणी श्री.चाबुकस्वार यांनी केली असल्यामुळे त्याबाबत 'माहिती' अंतर्गत कार्यवाही करणे शक्य नव्हते. मात्र अन्य मुद्दयांची माहिती देण्यात आली आहे, तसेच मध्यंतरीच्या काळात

समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद जाधव यांनी लेखी व तोंडी नमूद केले. समितीच्या कामाच्या तुलनेत अत्यंत कमी कर्मचारीवर्ग असून अन्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून तात्पुरती कामकाज व्यवस्थांतर्गत कामकाज करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे माहिती देण्यात विलंब झाला, श्री.जाधव यांनी विस्ताराने स्पष्ट केले. त्यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. समितीपुढील जाती प्रमाणपत्र पडताळणीबाबत संबंधित सुनावणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याबातच्या अहवालाची /निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. संबंधित जाती प्रमाणपत्र पडताळणीची सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सादर केलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास नि:शुल्क देऊन पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.६.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९५२/ सोलापूर | श्री. सलीम नबीलाल नदाफ १७१, गुरूवार पेठ, सोलापूर | व्यवस्थापक, वसंतराव नाईक वि. जा. भ. ज. महामंडळ, सोलापूर | व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक वि. जा. भ. ज. महामंडळ, जुहू, सुप्रिम बाजार, विलेपार्ले, मुंबई | १९९५ ते २००५ पर्यंत महामंडळाचे योजने - अंतर्गत केलेल्या कर्जवाटपाची, लाभार्थ्यांचे नाव, पत्ता, रक्कम, वाटप दिनांक, १९९५-९७ मधील द. सोलापूर तालुक्यातील जीप, ट्रॅक्टर वाटप यादी. | मूळ मागणीनुसार शुल्क भरून माहिती घेण्या - बाबत चर्चा झाल्याने समाधान झाले , तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ८.१०.०८ च्या ' विशेष अपील निर्गत कार्यक्रमां' च्या प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९५३/ सोलापूर | श्री. सलीम नबीलाल नदाफ १७१, गुरूवार पेठ सोलापूर | व्यवस्थापक, वसंतराव नाईक वि. जा. भ. ज. महामंडळ, सोलापूर | व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक वि. जा. भ. ज. महामंडळ, जुहू, सुप्रिम बाजार, विलेपार्ले, मुंबई | सन १९९५ ते २००७ चा कालावधीत दक्षिण सोलापूर तालुक्यात जीप व ट्रॅक्टर वाटप लाभार्थी नावे, पत्ता, रक्कम इत्यादी माहिती. | मूळ अर्जाबाबतच्या माहितीचा खुलासा झाल्याने समाधान झाले असून तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्यासह जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक ८.१०.०८ रोजीच्या ' विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' च्या प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १०१९/ सोलापूर | सौ. चंद्रप्रभा देवेंद्र आगसे चंद्रदेव अ / २७६, श्री. सालेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), सोलापूर-विजापूर रोड, सोलापूर | उपनिबंधक, सोलापूर, शहर सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | सोलापूर महानगरपालिका सर्वसाधारण सेवकांची सहकारी पतसंस्था (म.),सोलापूर या पतसंस्थेंच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम ८८ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका/ पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटिशन ५६६६/ २००७ मध्ये दिलेला आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र ९५२/सोलापूर, ९५३/ सोलापूर व १०१९/ सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र १०१९/ सोलापूर संदर्भात नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थेंची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे,ती त्या- त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**पुणे**
**दि.३०.०६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९५९/ सोलापूर | श्री.सुभाष सिद्रामप्पा ममदापुरे, महावीर उद्यान जवळ,करमाळा, जि. सोलापूर | ज्यू. ऑफिसर सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक लि,सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | व्यवस्थापक, सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बॅंक नियमित, शाखा करमाळा यांच्यावर सरव्यवस्थापक, सोलापूर यांनी केलेल्या कारवाई बाबतचा अहवाल. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका/ पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन ५६६६ /२००७ मध्ये दिलेला आहे. |
| २ | १३२४ / सोलापूर | श्री.लहू रामलिंग लांडे मु.धोत्रे. पो.खामगाव, ता.बार्शी, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, धोत्रे, ता.बार्शी जि. सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | इ. ८ वी ते १० वी मान्यता प्राप्त शिक्षकांची शैक्षणिक पात्रता कागदपत्रे, इ. ५ वी ते १० वी हजेरीपटावर नोंद असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची पत्यासह नावे, सावित्रीबाई फुले योजना उपस्थिती भत्ता व इतर एकूण ७ मुद्यांची माहिती. | अपीलकर्त्याने दारिद्रय रेषेखालील लाभार्थी असल्याचा पुरावा सादर केल्यास माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.मात्र मागणीनुसार माहिती देतानाही विद्यार्थिनींचे पत्ते देऊ नयेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १४४०/ सोलापूर | श्री.भिमराव लक्ष्मण पवार मु.पो.आंधळगाव, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा, जि.सोलापूर | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळवेढा, जि. सोलापूर | मौजे आंधळगाव या गावासाठी २००३ ते ०७ पर्यंत कोणकोणत्या योजनेतून कोणकोणती कामे केली त्याची रक्कमनिहाय व ठेकेदारनिहाय माहिती, २००३ ते ०७ लेखा परीक्षण अहवाल, पंचायत समिती कार्यालयातील आरक्षणनिहाय कर्मचारी यादी, पगार व टेबल, तीन वर्षापेक्षा जास्त काळ काम केलेल्या कर्मचा-यांची यादी व इतर एकूण ५ मुद्यांची माहिती. | सद्यस्थितीत माहितीची आवश्यकता नसल्याने अपील निकाली काढणेबाबत अपीलकर्त्यान दि.१६.०४.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. माहिती मागून आयोगाकडे अपील केल्यानंतर ती नको असल्याचे कळविण्याची अपीलकर्त्याची [illegible] योग्य नाही. |
| ४ | १४५०/ सोलापूर | श्री.शरणप्पा श्रीमंत चलगेरी मु.पो.संगोगी (आ), ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभागीय कार्यालय, अक्कलकोट जि.सोलापूर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. विभागीय कार्यालय, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर | अक्कलकोट तालुक्यातील सन ९७ - ९८ व २००२ ते ०७ पर्यंत दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना दिलेल्या वीज कनेक्शनची गाव निहाय यादी, लाभार्थीच्या साहित्याचे शासनाकडील पोच रजिस्टर, पोच पावत्या झेरॉक्स, वीज चोरी करणा-यावर केलेली कारवाई, जप्त मालमत्ता वर्णन व इतर एकूण ४ मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याचे दि. १५.०४.२००९ रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रासोबत सादर केले. |
| ५ | १४५१ / सोलापूर | श्री. राजीव वसंत कांबळे ७३९/४/१०, पाटील प्लॉट, शिवाजीनगर, बार्शी, जि. सोलापूर | प्राचार्य, अध्यापिका विद्यालय, बार्शी, जि.सोलापूर | सचिव / अध्यक्ष, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर, ता.माळशिरस, जि. सोलापूर | दि. २४.०४.०८ रोजी श्री सोनटक्के यांनी दिलेल्या अर्जावर केलेला कारवाई अहवाल, श्री. सोनटक्के यांच्या तक्रारीनुसार विद्यार्थीनींचा जबाब घेतला आहे काय, घेतला असल्यास जबाबाच्या साक्षांकित प्रती, सुप्रिया थोरात यांच्या सोनटक्के सबंधीच्या तक्रारीनुसार तब्बसूम शेख या मुलीची घेतलेली जबाबाची सत्यप्रत, थोरात संदर्भात सोनटक्के यांनी दिलेल्या एस. एम. एस च्या प्रिंट आऊट्स. | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १४५६/ सोलापूर | श्री. महंमद गौस हरून मुजावर मु.पो.कडलास नाका, सांगोला, ता.सांगोला जि. सोलापूर | मुख्याध्यापक ज्ञानदीप विद्यालय, सांगोला, जि.सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर | शैक्षणिक वर्ष १९९९ ते २००१ मध्ये क्लार्क पदी कोणाची नेमणूक होती, २००३ - ०४ मध्ये प्रयोगशाळा परीचर पदी कोणाची नेमणूक केली आहे, २००३ - ०४ चा लेखापरिक्षण अहवाल. | अपीलकर्त्याने समक्ष माहिती स्वीकारून पोच देण्यास नकार दिला, माहिती स्वीकारून माहिती मिळाली असे लिहून देण्यास नकार दिल्याने सदर माहिती रजिस्टर पोस्टाने देत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ज्ञानदीप विद्यालय यांनी दि. २०.०४.०९ च्या पत्राने आयोगास कळविले आहे. समक्ष माहिती न स्वीकारण्याची अपिलकर्त्याची कृती योग्य नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ६ (अपील क्र ९५९, १३२४, १४४०, १४५०, १४५१ व १४५६) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र ९५९ मध्ये नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे, ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

**पुणे**
**दि. ३०.०६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९६/ २००९/ पुणे | श्री.संजीव ज्ञानेश्वर गव्हाणे मु.थापेवाडी, पो.पाबळ, ता.शिरुर, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, विमानतळ पोलीस ठाणे, खराडी चंदननगर बायपास, पुणे नगर हायवे, पुणे | अपिलीय प्राधिकारी, विमानतळ पोलीस ठाणे, खराडी चंदननगर बायपास, पुणे नगर हायवे, पुणे | श्री.रामदास जाधव हे पोलीस अधिकारी दि.०१.१०.०८ ते १५.१०.०८ या कालावधीतील कोणत्या पाळीमध्ये काम करत होते, त्यांच्या हजेरी पत्रकाची छायांकित प्रत, माझे लायसन्स कोणत्या गुन्ह्याखाली जप्त इ. ७ मुद्यांची माहिती | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ९८/ २००९/ पुणे | श्री.बाबुराव जयराम सोनवणे सर्व्हे नं.६४२/६/२, प्लॉट नं.११, त्रिमूर्ती प्रसन्न सह,गृहनिर्माण संस्था मर्या.बिबवेवाडी, पुणे-३७ | जन माहिती अधिकारी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सह बँक मर्यादित, बिबवेवाडी, पुणे-३७ | जनरल मॅनेजर, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित (मुख्य शाखा), ४ ब,बी.जे.पथ, पुणे-१ | चेअरमन, त्रिमूर्ती प्रसन्न सह. गृहरचना संस्था मर्या.यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे मुख्य ब्रँच, पुणे-१ अकाऊंट नं. ११९००४०२९५, रु.३१७८/-, दि.१३.०३.२००७ रोजीचा चेक क्र.१७९४८४ बाबत एकूण ०३ मुद्यांची माहिती | १) अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही स्टेट बँक ऑफ इंडियाशी निगडित असल्याने ही बाब केंद्रिय माहिती आयोगाच्या कक्षेत येते. २) जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४६७/ २००९/ पुणे | सौ.सविता नंदलाल जयस्वाल ३४७, रविवार पेठ, नवीन मराठी शाळेसमोर, पुणे-३० | उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे शहर (१), पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | मयुरेश निवास सह.गृहरचना संस्था मर्यादित शनिवार पेठ पुणे या संस्थेचा सन १९८९ ते २००८ चा अहवाल सोसायटीच्या मालकी हक्काचे कागदपत्रे, सह रजिस्टारकडे नोंदणी झालेल्या खरेदीखताच्या पावत्या, टेंडर काढण्यात आलेल्या कामाचे बँकेच्या स्टेटमेंटसह हिशोबाची कागदपत्रे इत्यादी | अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ४ | ४६८/ २००९/ पुणे | श्रीम. मुक्ता पांडुरंग सोळुंके सायनतारा अपार्टमेंट, प्लॉट नं.१०१, यशवंतनगर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, लोणावळा नगरपरिषद, शिक्षण मंडळ, ता.मावळ, जि.पुणे | अपिलीय प्राधिकारी, लोणावळा नगरपरिषद, शिक्षण मंडळ, ता.मावळ, जि.पुणे | सन २००३ ते सन २००८ या कालावधीतील मागासवर्गीय शिक्षकांचे अनुशेष व सेवा ज्येष्ठता यादी इ.माहिती | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ४ (अपील क्र. ९६/२००९/पुणे, ९८/२००९/पुणे, ४६७/२००९/पुणे व ४६८/२००९/पुणे, ) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० -०६-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश काढण्यात येत आहेत

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९६९/ सांगली | श्री.जगन्नाथ हिंदुराव माने मु.पो.कुंडल (ग्रामपंचायत जवळ,कुंडल), ता.पलूस, जि.सांगली | नायब तहसीलदार तहसील कार्यालय,तासगाव ता.तासगाव, जि. सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय, तासगाव, जि. सांगली | मौजे कुंडल येथील फेरफार नं. ६६३० चा उतारा मिळणेबाबत | याबाबत स्वतंत्र नियमावलीनुसार अर्ज करणे आवश्यक आहे. |
| २ | ९८०/ सांगली | श्री सुरेश ज्योतीराम म्हमाने 'विरंगुळा' साखर कारखाना, सांगली | उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, सांगली | पोलीस अधिक्षक, पोलीस मुख्यालय, विश्रामबाग, सांगली | न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान करण्यामागील कारणमीमांसा, कर्तव्यात कसूर करणेमागील कारणमीमांसा, गुन्हेगारांना पाठीशी घालण्यामागील हेतू व कारणमीमांसा इ.५ मुद्दयांची माहिती | स्पष्टीकरण, खुलासा मागणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | ९९२/ सांगली | चि.आशिष सूर्यकांत कोरी ८९७, माने सदनिका, विनायक चौक, सेना | प्रमुख लिपिक, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे | उप आयुक्त, (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे | अपीलकर्त्याने दि. १७/९/२००८ रोजी दिलेल्या पत्रावर कोणती कारवाई करण्यात आली | अनेक कार्यालयांकडील सर्वसाधारण पध्दतीची माहिती मागणारे अर्ज एकाच कार्यालयाकडे केले आहेत, अपीलकर्त्याने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंदिर रोड, गावभाग, सांगली | | विभाग, पुणे | महानगरपालिके-बाबत आलेल्या तक्रारीवर कोणती कारवाई केली जाते, विभागीय आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य , यांच्यावर कोणाचे नियंत्रण असावे इ.१३ मुद्दयांची माहिती | 'आयुक्त', महापालिका यांचे अधिकार कर्तव्य कोणती, अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे. ती सार्वजनिकरीत्या उपलब्ध आहे. संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे . |
| ४ | ९९३/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, मिरज, जि.सांगली | अधिक्षक (प्रशासन) सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा | अधिक्षक अभियंता , सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा | कर्मचाऱ्यांच्या बदल्या, नेमणुका, रिक्त पदे पगार व सेवापुस्तकाबाबत एकूण ४ मुद्दयांची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | ९९४/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती , यशवंतनगर, मिरज, जि.सांगली | उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, पुणे | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ,पुणे | श्री.के.एस.धर्माणी कार्यकारी अभियंता यांच्या पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या इतर सेवाविषयकबाबी व मालमत्तेचे विवरणपत्राच्या प्रती याबाबत ५ मुद्दयांची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ६ | ९९५/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती , यशवंतनगर, मिरज, जि.सांगली | वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | अतिरिक्त आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | वडर कॉलनी मधील दवाखान्यातील डार्क रुमच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्दयांची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ९९६/ सांगली | श्री.रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती , यशवंतनगर, मिरज, जि.सांगली | अन्नधान्य वितरण अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आटपाडी, जि.सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय, आटपाडी, जि.सांगली | दिघंची , ता.आटपाडी येथील रेशन दुकान व रेशनकार्डधारकाच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्दयांची माहिती | अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ८ | ९९७/ सांगली | श्री. दिलीप सखाराम माने व्दारा माने ॲण्ड माने ॲटोमोबाईल, एस.टी.स्टॅण्ड समोर, इस्लामपूर, ता.वाळवा, जि. सांगली | जन माहिती अधिकारी, बसवेश्वर कल्लाप्पा स्वामी (सचीव, ठेवीदार संघटना,इस्लामपूर) जि. सांगली | सहायक निबंधक, वर्ग२, उरुण इस्लामपूर, जि. सांगली | सदर ठेवीदार संघटनेच्या अनुषंगाने एकूण ९ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक वर्ग २ उरुण -इस्लामपूर यांनी अर्जातील मुद्दा क्र.१ ते ९ बाबतची माहिती या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाही, असे कळविले आहे, ते योग्य आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ८ (क्र.९६९, ९८०, ९९२ ९९३, ९९४, ९९५, ९९६ व ९९७/सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४-०६-२००९.